Modern Education Society's
**NESS WADIA COLLEGE OF COMMERCE**
19, Prin. V. K. Joag Path.Pune - 411 001. Maharashtra State (India)
Website: www.nesswadiacollege.edu.in
Senior College ID/No.: PU/PN/C/021/1969
Senior College Code No.: 060 Junior College Code No.: J.I 1.15.003
**Re-accredited by NAAC with an 'A' Grade** (2014-2019)
Affiliated to the University of Pune and Recognised by Government of Maharashtra
Recognised Under Section 2(f) and 12(B) of UGC Act, 1956.



College (O): 020-26167024 / 26160909 Fax : 020-2616 3149 / 26160572 E-mail: nesswadiacollege@gmail.com

०१.०९.२०२२

# अत्यंत महत्वाचे

## सूचना

## दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना २०२२ – २३

केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, नवी दिल्ली यांचे मार्फत राबविण्यात येणा-या दिव्यांगजन विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य करणे या उद्देशाने दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येते. सन २०२२-२३ मध्ये सदर शिष्यवृत्ती योजनेकरीता नविन मंजूरीचे (Fresh) आणि नुतनीकरणाचे (Renewal) अर्ज ऑनलाईन (Online) पध्दतीने एन.एस.पी पोर्टल वरून मागविण्यात येत आहेत ऑफलाईन (Offline) पध्दतीने भरलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्वीकारले जाणार नाहीत. नवीन मंजूरीसाठी केंद्रशासनाकडुन गुणवत्ता यादी (Merit List) तयार करण्यात येते विद्यार्थ्यांना मंजुर झालेल्या शिष्यवृत्तीची रक्कम केंद्रशासनामार्फत थेट विद्यार्थ्यांच्या खात्यात (Under DBT Mode) जमा करण्यात येते.

**किमान पात्रता व अटी :**

१. अपंगत्व टक्केवारी ४० टक्के किंवा त्यापुढील असावी.
२. मागील वार्षिक परीक्षेत उत्तीर्ण झालेला असावा.
३. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा / स्टायपेंड चा लाभार्थी नसावा.
४. अर्जदाराच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न मर्यादा रू २.५० लाख पर्यंत असावे.

दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी नवीन मंजुरीसाठी व नूतनीकरणासाठी www.scholarships.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणे आवश्यक आहे.

**विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत दि. ३१.१०.२०२२ ही आहे.**
सर्व विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती ऑनलाईन अर्ज भरून सर्व कागदपत्रासह मुदतीत शिष्यवृत्ती काउंटर नं ३ वर जमा करावा

**अधिक माहितीसाठी दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना २०२२ – २३ महाराष्ट्र शासन ची जाहिरात पहावी.**

5/9/22
प्र. प्राचार्य

Ness Wadia College of Commerce Pune-1

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण**
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**
Email Id – jdhepune@gmail.com Website – www.jdhepune.info
फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

जा.क्र. एनएसपी पोर्टल-२०२२-२३/(४२२१/२०२२)/शिष्यवृत्ती/ 2426 दिनांक : १.८.२०२२

**अत्यंत महत्वाचे / तात्काळ**

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कनिष्ठ / वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा.

**विषय : - केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे मार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्र शासन पुरस्कृत दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना सन २०२२-२३ च्या अंमलबजावणी बाबत....**

संदर्भ : - मा. शिक्षण संचालनालयाचे ईमेलद्वारे प्राप्त पत्र क्र. उशिसं/शिष्य/दिव्यांगजन/ २०२२-२३/१००४६ दि २७.७.२०२२.

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, नवी दिल्ली यांचे मार्फत राबविण्यात येणाऱ्या दिव्यांगजन विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य करणे या उद्देशाने दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येते. सन २०२२-२३ मध्ये सदर शिष्यवृत्ती योजनेकरीता नविन मंजूरीचे ( Fresh) आणि नुतनीकरणाचे (Renewal) अर्ज ऑनलाईन (Online) पध्दतीने एन एस पी पोर्टल वरुन मागविण्यात येत आहेत. ऑफलाईन (Offline) पध्दतीने भरलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्वीकारले जाणार नाहीत. नवीन मंजूरीसाठी केंद्रशासनाकडून गुणवत्ता यादी (Merit List) तयार करण्यात येते. विद्यार्थ्यांना मंजूर झालेल्या शिष्यवृत्तीची रक्कम केंद्रशासनामार्फत थेट विद्यार्थ्यांच्या खात्यात (Under DBT Mode) जमा करण्यात येते.

सदर शिष्यवृत्तीसाठी महाराष्ट्र राज्यासाठी नवीन (Fresh) शिष्यवृत्तीसाठी १८७९ संच निर्धारित केलेले आहेत. सदर शिष्यवृत्ती ११ वी, १२ वी, पोस्ट मॅट्रिक डिप्लोमा / सर्टीफिकेट पदवी, पदव्युत्तर डीग्री / डिप्लोमा व सर्टीफिकेट या अभ्यासक्रमासाठी देण्यात येते. सदर शिष्यवृत्तीसाठी इयत्ता १०वी, व १२ वी ची परीक्षा माध्यमिक शिक्षण मंडळातेन तसेच पदवी व पदव्युत्तर परीक्षा मान्यताप्राप्त विद्यापीठातून उत्तीर्ण झालेले विद्यार्थी अर्ज भरण्यासाठी पात्र आहेत.

- **किमान पात्रता व अटी :**

१. अपंगत्व टक्केवारी ४० टक्के किंवा त्यापुढील असावी.
२. मागील वार्षिक परीक्षेत उत्तीर्ण झालेला असावा.
३. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा / स्टायपेंड लाभार्थी नसावा.
४. अर्जदाराच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. २.५० लाख पर्यंत असावे.

- **नविन मंजूरी आणि नुतनीकरणासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची कार्यपध्दती :**

१. दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजनाच्या मार्गदर्शक तत्यानुसार पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी नवीन मंजूरीसाठी व नुतनीकरणासाठी www.scholarships.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणे आवश्यक आहे.

२. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत दि. ३१.१०.२०२२ ही आहे. व महाविद्यालयांनी अर्जांची पडताळणी करण्याचा अंतिम दिनांक १५.११.२०२२ ही आहे.

३. ज्या विद्यार्थ्यांकडे आधार क्रमांक आहे अशा विद्यार्थ्यांनी आधार क्रमांक या पर्यायाचा वापर करुन अर्ज भरावा. आधार क्रमांक नसेल तर त्याऐवजी आधार नोंदणी आयडी स्लीप किंवा बँक खाते पासबुकच्या प्रथम पानाची फोटोसह असलेली छायांकित प्रत अपलोड करुन अर्ज भरावा.

४. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे लाभ मिळणेसाठी आधार क्रमांक त्यांच्या बँकखात्याशी संलग्न (Link) असणे आवश्यक आहे. ज्यामुळे लाभार्थी विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती रक्कम सुरळीतपणे जमा होण्यास मदत होईल.

५. विद्यार्थ्यांचा बँक खाते चालू स्थितीत असणे (Operative / Active Mode) आवश्यक आहे. जेणेकरुन शिष्यवृत्ती रक्कमेचे वितरण अयशस्वी (Fail) होणार नाही.

६. विद्यार्थ्यांचे बँक खाते स्वतःच्या नावावर असणे आवश्यक आहे. जॉईंट खाते नसावे.

७. खाते क्रमांक व इतर बँक तपशील भरण्यात विद्यार्थ्यांकडून चूक झाल्यामुळे शिष्यवृत्ती विलंबाने मिळाल्यास / न मिळाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विद्यार्थ्यांची राहील.

८. ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी उपरोक्त संकेतस्थळाच्या Homepage वरील SOP (Standard Operating Procedure) वाचून व समजून घेऊनच ऑनलाईन अर्ज भरावा.

९. ऑनलाईन अर्ज भरताना विचारण्यात आलेली माहिती पूर्णपणे भरुन, ऑनलाईन अर्जाची प्रत आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह आपल्या महाविद्यालयाकडे पुढील कार्यवाहीकरीता सादर करावी.

१०. ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचण निर्माण झाल्यास आपल्या महाविद्यालय / संस्थेशी संपर्क साधून सदर अर्ज महाविद्यालयाच्या / संस्थेच्या मदतीने पूर्ण करुन घ्यावा.

- **विद्यापीठ / महाविद्यालय / संस्थेसाठी सूचना :**

विद्यार्थ्यांनी नवीन मंजूरीचा (Fresh) किंवा नुतनीकरणाचा (Renewal) चा ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांनी अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांवरुन अर्जांची छाननी करुन ऑनलाईन मंजूरी देण्याची कार्यपध्दती पार पाडावी तसेच मंजूर केलेले अर्ज व त्यासोबतची कागदपत्रे जतन करुन ठेवण्यात यावीत तपासणी अंती समितीस उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच महाविद्यालयांनी विभागाने दिलेल्या युजर आयडी व पासवर्ड वापरुन विहित वेळेत लॉगीन करावे व पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज विहित मुदतीतच पुढील स्तरावर ऑनलाईन फॉरवर्ड करावेत. अन्यथा सदर अर्ज अपात्र समजण्यात येतील.

दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना सन २०२२-२३ साठी प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित कुलसचिव / प्राचार्य / संस्थाप्रमुख यांची असेल अर्जदाराच्या सोयीसाठी केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सूचना व SOP (Standard operating Procedure) www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहे.

उपरोक्त सूचना आपल्या महाविद्यालयाच्या / विद्यापीठांच्या /संस्थेच्या सूचनाफलकाद्वारे कळविण्यात याव्यात. तसेच विविध सोशल माध्यमांद्वारे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना कळवावी. जास्तीत जास्त पात्र विद्यार्थ्यांनी या शिष्यवृत्तीचे लाभ घ्यावा याकरीता या शिष्यवृत्ती योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच यासंबंधित केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास त्वरीत सादर करण्यात यावा.

केंद्रशासन पुरस्कृत दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक योजनेपासून एकही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीबाबतची माहिती न मिळाल्यामुळे शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्या त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यापीठामधील विद्यार्थ्यांबाबत संबंधित विद्यापीठाचे कुलसचिव यांची राहील. याची सर्व महाविद्यालय / संस्था / विद्यापीठांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.

(डॉ. किरणकुमार बोंदर)
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

**प्रत माहिती व कार्यवाहीस्तव,**

**आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व इयत्तांच्या अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांना तसेच पदविका अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांना याबाबत कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना देण्याच्या आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.**

प्रति -
१. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांना माहितीसाठी सादर.
२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे
६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
७. प्राचार्य, तंत्रनिकेतन व औद्योगिक प्रशिक्षण संस्था.
८. प्राचार्य, वैद्यकिय महाविद्यालये.
९. मा. शिक्षण उपसंचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय, पुणे १.
१०. मा. शिक्षण उपसंचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय, नाशिक.